महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

प्रकाशगड, २रा माळा, प्लॉट क्र. G9, प्रोफे. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी क्र. : ०२२ - २६४७ ४२११ विस्तारित - ३६४२, फॅक्स : ०२२ - २६५८ १५१६.
ई-मेल : promahagenco@gmail.com / promahagenco1@gmail.com

क्र. : सा.नि.सु./जनसंपर्क/वृत्तपत्रीय टिप्पणी/२४ दिनांक : २९/०५/२०२०.

## वृत्तपत्र टिप्पणी

## महानिर्मितीच्या परळी व खापरखेडा औष्णिक वीजनिर्मिती केंद्राची लक्षणीय कामगिरी

**मुंबई (दि. ०८/१०/२०२०)** : संपूर्ण देशामध्ये लॉक डाऊन टप्पा- ५ सुरु झाल्यानंतर ओद्योगिक तसेच वाणिज्य आस्थापनांमध्ये विजेची मागणी वाढत आहे. महाराष्ट्र राज्याची विजेची पूर्तता करून राज्यातील वीज ग्राहकांना अखंडित वीज पुरवठा करण्याकरिता महानिर्मिती नेहमीच महत्वाचे योगदान देत असते .

महानिर्मितीच्या परळी औष्णिक वीज केंद्राच्या प्रत्येकी २५० मेगावॅट स्थापित क्षमता असलेल्या संच क्र. ६, ७ व ८ द्वारे नुकतीच सरासरी ९८% भारांक (पी.एल.एफ.) साध्य करत ७३२ मेगावॅट इतकी वीज निर्मिती केली आहे. विशेषत: संच क्र. ६ चा भारांक १०० टक्के आहे. तसेच खापरखेडा येथील २१० मेगावॅट क्षमतेच्या संच क्र. ४ द्वारे देखील १०० दिवसांपासून अखंडित वीज निर्मिती केली जात असून ५०० क्षमतेच्या संच क्र. ५ मधूनही सलग ९६ दिवस वीजनिर्मिती सुरू आहे. सदर दोन्ही औष्णिक वीज निर्मिती केंद्रातील सर्व अभियंते व कर्मचारी यांचे महानिर्मितीच्या मुख्यालयातील वरिष्ठ व्यवस्थापनाने अभिनंदन केले आहे.

---

दिनांक : ०८/१०/२०२०.

प्रति,
**मा. संपादक**
**दैनिक / वृत्तवाहिनी**

आदरणीय महोदय / महोदया,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तींत / वाहिनीवर प्रसिद्ध करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपले स्नेहांकित,

**(महेश आफळे)**
**जनसंपर्क अधिकारी**